# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 01/03/2023 (गुरूवार) सकाळ

---

## चोरी

**१) पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील महाजन नगर टेकाडी येथे मंदीर जवळ कन्हान येथे दिनांक २८/२/२०२३ चे ०२.०० ते ०२.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– रवीकांत रामदास कंडे, वय ४५ वर्ष, wcl गार्ड इंचार्ज रा. चनकापुर कॉलोनी कॉर्टर नं २६/१ हे आपले कर्तव्यावर हजर असताना गुप्त बातमीदारांकडुन माहिती मिळाली की, टेकाडी गावाकडे एक मारोती व्हॅन क्र. एम. एच–३१/ए.एच–२०३९ मध्ये कोळसा भरुन नेत आहे अशा मिळालेल्या गुप्त माहिती वरून फिर्यादी आपल्या स्टाफ सह नमुद घटनास्थळी गेले असता एक व्हॅन मिळुन आली सदर वाहनाची पाहणी केली असता सदर वाहनामध्ये आरोपी नामे– आकाश बंडुजी इंगळे, वय २८ वर्ष, रा. वार्ड नं. ०२ साईमंदीर टेकाडी कन्हान हा कोळसा वजन १५०० किलोग्रॅम किंमती अंदाजे ९०००/– रु. गाडी किंमती अंदाजे २५०००/– असा एकुण वाहनासह ३४०००/– रूपयाचा मुददेमाल घेवुन जातांना मिळुन आल्याने सदर आरोपीची विचारपूस केली असता त्याने सांगीतले की, इंदर ओवरबर्डन डपींग येथुन कोळसा चोरुन आणला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी सुरजुसे पोस्टे कन्हान मो नं. ९९२१४३४२६७ हे करीत आहे.

**२) पो.स्टे. देवलापार** :– अंतर्गत ०५ कि. मी. अंतरावरील देवलापार येथे दिनांक २७/०२/२०२३ चे २१:०० ते २८/०२/२०२३ चे ०६.०० वा. दरम्यान मौजा देवलापार येथील दुर्गा माता मंदीराचे शटरचे लॉक तोडुन कोणीतरी अज्ञात चोराने मंदीरामध्ये ठेवलेले दान पेटीचे सुध्दा लॉक तोडुन त्यामधील असलेले अंदाजे ४००००/–रूपयाचा मुद्देमाल चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी नामे– जितेंद्र हरिचंद्र सरोदे, वय ४७ वर्ष, रा. वार्ड क्र. २ देवलापार (मंदीर ट्रस्टचे सचिव) यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. देवलापार येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक ब. नं. १९७४ संदीप नागोसे ७९७२२१२१३२ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**